शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर
मिळणारा प्रवासभत्ता -

-२५-

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

भरपत्र क्रमांक-टी.आर्.ए-१०६६-अठरा

सचिवालय,मुंबई-३२, दिनांक १० फेब्रुवारी १९६७

२१ माघ, १८८८

पहा:- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-टीआर्ए-१०६४-१०४६-अठरा, दिनांक १६ जुलै १९६६.

भरपत्र:-(१) शासन निर्णय क्रमांक-टीआर्ए-१०६४-१०४६-अठरा, दिनांक १६ जुलै १९ यांतील परिच्छेद ३ च्या उप-परिच्छेद(४) मधील "त्यास ह्या सवलती मिळणार नाहीत या शब्दांऐवजी, "त्यास, किंवा शिक्षेदाखल उपाययोजना म्हणून ज्यास सक्तीने निवृत्त केले असेल अशा कर्मचाऱ्यांस ह्या सवलती मिळणार नाहीत", हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

(२) (अ) उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद २(ब) (२) मध्ये "प्रत्यक्ष खर्च" या शब्दानंतर "व वेष्टनाचा खर्च" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(ब) "आणि नियम ४९० (ए) दोन (२) खाली अनुज्ञेय असलेला" या मजकुराऐवजी "नियम ४९०(ए) दोन (२) आणि ४९०(एए) या खाली अनुक्रमे अनुज्ञेय असलेला" हा मजकूर दाखल करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

र. रा. कुलकर्णी,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग.

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
वरिष्ठ उप-महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

५२४

( मागे पहा -

शामुमु.रोटा-वित्त-एव्ह-१२७७(५५००+१०-६७)